# GRAMGEETA MAHAVIDYALAY CHIMUR

## *Library Advisory Committee*

## Notice

महाविद्यालयाच्या ग्रंथालय सल्लागार समितीच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येत आहे की, या सत्रातील ग्रंथालय सल्लगार समितीची पहिली सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्येक्षतेखाली दिनांक १५/०९/२०२१ रोज बुधवारला दुपारी ठीक १२.३० वाजता घेण्यात येणार आहे . करीता समितीच्या खालील सर्व सभासदांनी सभेला उपस्थित राहावे.

धन्यवाद!

**सभेचे विषय:** १)मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२)ग्रंथालय सल्लागार समिती गठीत करणे.

३)मागील वर्षात झालेल्या खर्चाचा आढावा घेऊन नवीन सुरु झालेल्या सत्रासाठी अंदाजपत्रक करणे.

४) मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

| **सभासदांचे नाव** | **सह्या** |
|---|---|
| १)डॉ. अमीर ए. धमानी(अध्यक्ष)-- | (signature) |
| २) प्रा. हुमेश्वर आनंदे (सदस्य)-- | (signature) |
| ३)प्रा. अरुण पिसे(सदस्य)-- | (signature) |
| ४)प्रा. सुशीला गजभिये(सदस्या)-- | (signature) |
| ५)कु. वैष्णवी मडकाम B.Sc. II (विद्यार्थी प्रतिनिधी)-- | Qmadkam |

समिती समन्वयक
प्रा. एस.ए.मेश्राम

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

# सभा इतिवृत्त

ग्रंथालय सल्लागार समितीची सभा आज दिनांक १५/०९/२०२१ रोज बुधवारला दुपारी १२.३० वाजता मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली. आजच्या सभेला खालीलप्रमाणे सर्व सभासद उपस्थित होते आणि सर्वांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. आज झालेल्या सभेमध्ये पुढील विषयवार चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आले.

| सभावृत्तांत | |
|---|---|
| **विषय क्र.१:** मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | **ठराव** : आजच्या सभेमध्ये समिती समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी दि. २२/०१/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त उपस्थित सभासदांसमोर वाचून सादर केले त्यानंतर चर्चा करून सर्व संमतीने इतिवृत्त मंजूर करून कायम करण्यात आले.<br>ठराव मंजूर. |
| **विषय क्र.२:** ग्रंथालय सल्लागार समिती गठीत करणे. | **ठराव** : आजच्या सभेमध्ये ग्रंथालय सल्लागार समिती गठीत करण्याविषयी चर्चा करण्यात आली असता मागील वर्षातील शिक्षक सदस्यांचे सभासदत्व कायम ठेऊन विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. वैष्णवी मडकाम B.Sc.-II या विद्यार्थिनीला समितीमध्ये प्रतिनिधित्व दयावे, यावर चर्चा करून सर्वमताने तिची समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली व समितीच्या वतीने तिचे स्वागत करण्यात आले. ठराव मंजूर. |
| **विषयक्र.३:** मागील वर्षातील ग्रंथालय विभागाच्या खर्चाचा आढावा घेऊन शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता अंदाजपत्रक तयार करणे. | **ठराव** : आज सुरु असलेल्या सभेमध्ये समिती अध्यक्ष व सभासदांनी ग्रंथालय विभागामध्ये २०२०-२१ मध्ये करण्यात आलेल्या खर्चाच्याविषयी विचारणा केली असता समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी करण्यात आलेल्या खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे दिली...<br>क्रमिक पाठ्यपुस्तके - १९६४६/-<br>विषय संदर्भ ग्रंथ - ५४०५६/-<br>स्पर्धापरीक्षा ग्रंथ - २०१२९/-<br>नियतकाली व मासिक - ७४३५/-<br>DELNET सदस्यत्व फी- १९४७०/-<br>वर्तमान पत्रे - १४८८१/-<br>बुक कपाट खरेदी - २८५००/-<br>**एकूण झालेला खर्च - १६४११७/-**<br>यावर समाधानकारक चर्चा करून सत्र २०२१-२२ करीता |

| | |
|---|---|
| | अंदाजे खर्चाची विचारणा केली असता समिती समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी खालील प्रमाणे अंदाजपत्रक सादर केले.<br><br>क्रमिक पाठ्यपुस्तक - १००००/-<br>विषय संदर्भ ग्रंथ - ५००००/-<br>अवांतर वाचन ग्रंथ - १००००/-<br>स्पर्धा परीक्षा ग्रंथ - ५०००/-<br>नियतकालिके/मासिक - १००००/-<br>फर्निचर खरेदी - ३००००/-<br>**एकूण अंदाजे खर्च - ११५०००/-**<br>अशाप्रकारे समोर करण्यात येणारा अंदाजे खर्च सादर केल्यानंतर समिती सदस्यांनी त्यावर चर्चा केली असता मा. अध्यक्ष यांनी वरील अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे असे जाहीर केले.<br><br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| **विषय क्र.४:** मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारा विषय.. | **ठराव** : या विषयाच्या अनुषंगाने उपस्थित सभासदांनी कोणताही प्रश्न उपस्थित न केल्यामुळे समिती समन्वयक यांनी सर्व सभासदांचे आभार मानले व मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली. |

**सभासदांचे नाव** **सह्या**

१)डॉ. अमीर ए. धमानी(अध्यक्ष)--

२)प्रा. हुमेश्वर आनंदे (सदस्य)--

३)प्रा. अरुण पिसे(सदस्य)--

४)प्रा. सुशीला एस. गजभिये(सदस्या)--

५)कु. वैष्णवी मडकाम B.Sc. II (विद्यार्थी प्रतिनिधी)-- Vmadkam

समिती समन्वयक
प्रा. एस.ए.मेश्राम

प्राचार्य
Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

# GRAMGEETA MAHAVIDYALAY CHIMUR

## *Library Advisory Committee*

## Notice

महाविद्यालयाच्या ग्रंथालय सल्लागार समितीच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येत आहे की, या ग्रंथालय सल्लगार समितीची पहिली सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्येक्षतेखाली दिनांक ०१/०२/२०२२ रोज मंगळवारला दुपारी ठीक १.३० बाजता घेण्यात येणार आहे

करीता समितीच्या खालील सर्व सभासदांनी सभेला उपस्थित राहावे.

धन्यवाद!

**सभेचे विषय:**

१)मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२)ग्रंथालयामध्ये ग्रंथ खरेदी, नियतकालिके व मासिकाची वर्गणी भरणे.

३) DELNET सदस्यत्व नुतनीकरण करणे.

४) ग्रंथालयातील ग्रंथाना barcoding करणे.

५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**सभासदांचे नाव** सह्या

१)डॉ. अमीर ए. धमानी(अध्यक्ष)— Sd/-

२) प्रा. हुमेश्वर आनंदे (सदस्य)— Sd/-

३) प्रा. अरुण पिसे(सदस्य)— Sd/-

४) प्रा. सुशीला गजभिये(सदस्या)— Sd/-

५) कु. वैष्णवी मडकाम B.Sc. II (विद्यार्थी प्रतिनिधी)-- Vmadkam

समिती समन्वयक
प्रा. एस.ए.मेश्राम

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

## सभा वृत्तांत

ग्रंथालय सल्लागार समितीची सभा आज दिनांक ०१/०२/२०२२ रोज मंगळवारला दुपारी १.३० बाजता मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली. आजच्या सभेला खालीलप्रमाणे सर्व सभासद उपस्थित होते आणि सर्वांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. आज झालेल्या सभेमध्ये पुढील विषयवार चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आले.

| सभावृत्तांत | |
|---|---|
| **विषय क्र.१:** मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे | **ठराव** : आजच्या सभेमध्ये समिती समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी दि. १५/०९/२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त उपस्थित सभासदांसमोर वाचून सादर केले त्यानंतर चर्चा करून सर्व संमतीने इतिवृत्त मंजूर करून कायम करण्यात आले. ठराव मंजूर. |
| **विषय क्र.२:** ग्रंथालयामध्ये ग्रंथ खरेदी, नियतकालिके व मासिकाची वर्गणी भरणे. | **ठराव:** सदर विषयाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात येऊन ग्रंथखरेदी करतांना विषयनिहाय संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात यावे, तसेच अवांतर व स्पर्धा परीक्षांचे ग्रंथ काही प्रमाणात खरेदी करण्यात यावे.त्याचप्रमणे नवीन मासिकांची वर्गणी भरतांना दर्जेदार व चांगल्या गुणवत्तेचे मासिकांची वर्गणी भरण्यात यावी, असे ठरले. त्या संदर्भात समन्वयक यांनी सामान्य ज्ञान दर्पण, सक्सेस मिरर, इंडिया टुडे , मुक्ता, साधना साप्ताहिक, व अक्षरगाथा असे काही नाव सुचविले असता समितीने मंजुरी दिली. सर्वानुमते ठराव मंजूर. |
| **विषय क्र.३:** DELNET सदस्यत्व नुतनीकरण करणे. | **ठराव** : आज सभेमध्ये, ग्रंथालय विभागात ई-संसाधनाकरीता DELNET चे सदस्यत्व घेतले असून दि. २५/०३/२०२२ नंतर ते संपुष्टात येईल, करीता त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे अशी मागणी समन्वयक प्रा. संदिप मेश्राम यांनी केली असता सर्व सदस्यांनी त्यावर चर्चा करून DELNET सदस्यत्वाचे नुतनीकरण करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. ठराव सर्वानुमते मंजुर. |
| **विषय क्र.४:** ग्रंथालयातील ग्रंथांना Barcoding करणे. | **ठराव** : आजच्या सभेमध्ये प्रा. संदिप मेश्राम यांनी कोविडच्या काळामुळे ग्रंथांना बारकोड लावण्याचे काम रखडलेले असून आता बारकोड करून ग्रंथ देव-घेव सेवा अद्ययावत करावयास पाहिजे असे मत व्यक्त केले त्यावर प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी दुजोरा देत होकार दर्शविल्यानंतर मा. अध्यक्ष यांनी, बारकोड |

| | |
|---|---|
| | करण्यासाठी लागणारे साहित्याची खरेदी करून ग्रंथाना बारकोड करावे व ग्रंथालय सेवा अद्ययावत करावी अशी सूचना केली. ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. |
| **विषय क्र.५:** मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणारा विषय.. | **ठराव :** या विषयाच्या अनुषंगाने उपस्थित सभासदांनी कोणताही प्रश्न उपस्थित न केल्यामुळे समिती समन्वयक यांनी सर्व सभासदांचे आभार मानले व मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभा समाप्त करण्यात आली. |

**सभासदांचे नाव** **सह्या**

१)डॉ. अमीर ए. धमानी (अध्यक्ष)--

२)प्रा. हुमेश्वर आनंदे (सदस्य)--

३)प्रा. अरुण पिसे (सदस्य)--

४)प्रा. सुशीला एस. गजभिये (सदस्या)--

५)कु. वैष्णवी मडकाम B.Sc. II (विद्यार्थी प्रतिनिधी)--

समिती समन्वयक
प्रा. एस.ए.मेश्राम

प्राचार्य

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur